## प्रेस नोट

### यमुनानगर निगडी येथील एल.आय.सी. ची २५ लाख ६१ हजार रूपये रोकड लुटणाऱ्या टोळीस गुन्हे शाखा, युनिट ४ कडुन अटक, १३,५२,०००/- रोख रक्कम जप्त

दि.३/०५/२०१८ रोजी चेकमेट कंपनीचे कर्मचारी हे दुपारचे सुमारास यमुनानगर, निगडी येथील एल.आय.सी. ची रोख रक्कम घेवुन जात असताना अज्ञात चार इसमांनी त्यांचेजवळ येवुन त्यांचेवर चाकुने प्राणघातक हल्ला करून त्यांचेजवळील रोख रक्कम २५ लाख ६१ हजार रूपये जबरदस्तीने घेवुन पळुन गेले होते. सदर बाबत निगडी पोलीस ठाणे येथे जबरी चोरीचा गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने गुन्ह्याचा तपास हा पोलीस ठाणे बरोबरच गुन्हे शाखेचे पथके सुध्दा आरोपींचा शोध घेत होते. गुन्ह्याचा वेगवेगळ्या पध्दतीने तपास करून तसेच गुन्हा घडलेल्या ठिकाणाचे आजु बाजुचे परीसरामधिल सी.सी. टिव्ही फुटेज चेक करून सुध्दा गुन्ह्या बाबात काहीएक सुगावा लागत नव्हता. गुन्हे शाखा, युनिट ४ चे सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील यांना त्यांचे विश्वसनिय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, चेकमेट कंपनीमध्ये पुर्वी कामास असलेला मुलगा राहुल संग्राम वाघमारे, वय २२ वर्षे, रा.सरदार मुरकुटे यांची चाळ, पॅनकार्ड क्लब रोड, पी.एम.सी. गार्डन शेजारी, बाणेर, पुणे याने त्याचे मित्रासह कट करून सदरचा गुन्हा केला आहे. वगैरे मजकुरची माहिती मिळताच सहा.पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ४ चे सहा.पोलीस निरीक्षक गणेश पाटील व स्टाफने बाणेर भागात सापळा लावुन त्यास ताब्यात घेतले.

आरोपी राहुल संग्राम वाघमारे यास अधिक विश्वासात घेवुन गुन्ह्याबाबत तपास करता त्याने साथीदार १) महादेव खापरे, रा.बाणेर, पुणे, २) सागर उर्फ बाळा खताळ, रा.जनवाडी, पुणे ३) सुरज आगरवाल, रा.वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे, तसेच त्यांची मैत्रिण नामे ४) पुजा चव्हाण रा. ससाणेनगर, हडपसर, पुणे यांचेसह एका अल्पवयीन मुलाच्या मदतीने केला असल्याचे कबुल केले. त्यापैकी १) महादेव लिंबाजी खापरे, वय २३ वर्षे, धंदा- अंडा बुर्जीची हातगाडी, रा.भुजबळ कॉलनी शेजारी, रामभाऊ लोखंडे यांची चाळ,३ रा मजला, भैरवनाथ मंदिरा शेजारी, बाणेर गाव, पुणे २) सागर उर्फ बाळा रामचंद्र खताळ, वय २१ वर्षे, धंदा मजुरी, रा.१०१ जनवाडी, जनता वसाहत, सोमेश्वर मंदिराचे मागे, पुणे तसेच त्याचा ३) अल्पवयीन साथीदार यांस त्यांचे राहते परीसरात ताब्यात घेतले. आरोपी व अल्पवयीन बालक यांचेकडे एकत्रित तपास करून गुन्ह्यातील चोरीस गेले रक्कमे पैकी १३ लाख ५२ हजार ६५० /- रू रोख रक्कम, तसेच चोरीच्या रक्कमेतुन विकत घेतलेले कि.रू.३४ हजार रूपायचे दोन मोबाईल तसेच गुन्हा करणे करीता वापरलेली २२० पल्सर व डिओ मोपेडे असा १, लाख ३० हजार रूपयाच्या दोन मोटार सायकली

